जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा

माळी पदाकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांकरीता सुचना

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा द्वारे दि. ०८/०४/२०२५ रोजी माळीचे ०१ पदाची निवड यादी व ०१ पदाची प्रतिक्षा यादी तयार करण्याबाबतची जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करुन पदाकरीता पात्र उमेदवारांनी त्यांचे ऑफलाईन अर्ज पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्रॉफ्ट (Postal Order/ Demand Draft) इत्यादीसह परिशिष्ट-अ मधील नमुन्यानूसार आर.पी.ए.डी. द्वारे (R.P.A.D) दि. २३/०४/२०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वा. पर्यंत या कार्यालयास पाठविण्याबाबत निर्देशीत करण्यात आलेले होते.

त्या अनुषंगाने उमदेवारांनी या कार्यालयास पाठविलेल्या अर्जांची पडताळणी केली असता ज्या उमेदवारांनी जाहिरातीमधील मुद्दा क्रं. २ नुसार मान्यता प्राप्त विद्यापिठाचा 'माळी' कामाचा अभ्यासक्रम पुर्ण केला असल्याबाबतची माहिती अर्जात नमुद केलेली आहे, त्यांनी ती मान्यता प्राप्त विद्यापिठातुनच घेतलेली आहे किंवा कसे ? **याबाबतची अर्जात नमुद केलेल्या अर्हतेनुसार प्रमाणपत्रावरुन पडताळणी करण्याकरीता व त्यानुसार उमेदवारांची अल्पसूची तयार करण्याचे अनुषंगाने उमेदवाराने मान्यता प्राप्त विद्यापिठातुन 'माळी' कामाचा अभ्यासक्रम पुर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्राची प्राधिकृत अधिकाऱ्याचे सही व शिक्क्यासह सत्यप्रत करुन आर. पी. ए. डी. द्वारे (R.P.A.D) दि. १७/०७/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत या कार्यालयास पोहोचेल या बेताने पाठविण्यात यावे.**

तसेच उमेदवारांना पुढे असे ही निर्देशीत करण्यात येते की, **जे उमेदवार त्यांचे 'माळी' कामाचा अभ्यासक्रम पुर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र हे प्राधिकृत अधिकाऱ्याचे सही व शिक्क्यासह सत्यप्रत करुन उपरोक्त नमुद तारखेपर्यंत सादर करणार नाही, तथापि, प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीची कलर किंवा छायांकित प्रत या कार्यालयास सादर करेल अशा उमेदवारांचे अर्ज गृहित धरल्या जाणार नाही याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

दिनांक : ०८/०७/२०२५.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा

टिप :- ज्या उमेदवारांनी केवळ किमान ०१ वर्षाचा बगीचे, हिरवळी, वनस्पती आणि झाडे इत्यादी सुस्थितीमध्ये ठेवण्याचा अनुभव आवेदन अर्जामधे नमुद करुन मुळ अनुभव प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केलेले आहे त्यांना सदर सुचना लागू होणार नाही.